# उल्हासनगर महानगरपालिका

पर्यावरण विभाग
दिनांक 26/08/2022

## आवाहन

शहरातील नागरीकांना कळविण्यात येते की, भारत सरकारच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने 12 ऑगस्ट 2021 रोजी अधिसुचना क्र. GSR 571(E) जारी केला आहे. प्लास्टीक (सिंगल युज प्लास्टीक) वस्तुंचे उत्पादन , आयात , साठा , वितरण , विक्री आणि वापर तसेच प्लास्टीक वेस्ट मॅनेजमेंट (PWM)नियम 2016 चे नियम 4(2) (सुधारीत केल्याप्रमाणे ) पॉलिस्टीरींन आणि विस्तारीत पॉलिस्टीरींन वस्तुंसह खालील एकल वापराच्या (सिंगल युज प्लास्टीक) वस्तुंचे उत्पादन , आयात , साठा , वितरण , विक्री आणि वापर प्रतिबंधित दि. 1 जुलै 2022 पासुन प्रभावी केले आहे.

अ) कान सफाईसाठी वापरण्यात येणा-या प्लास्टीकच्या काड्या , फुग्यासाठी वापरण्यात येण-या प्लास्टीकच्या काड्या, प्लास्टीकचे ध्वज , कॅण्डी स्टिक्स , आइस्क्रीम स्टिक्स , पॉलिस्टीरींन (थर्माकोल) सजावटीसाठी

ब) प्लेट्स , कप, ग्लासेस , कटलरी जसे की काटे ,चमचे ,चाकु, स्ट्रॉ, ट्रे, मिठाइच्यापेटी भोवती गुंडाळलेले किंवा पॅकिंग प्लास्टीक आवरण, निमंत्रण पत्रिका आणि सिगारेट पाकिटाचे आवरण , 100 मायक्रॉनपेक्षा कमी आकाराचे प्लास्टीक किंवा पीव्हीसी बॅनर ,ढवळण्या (स्टरर्स)

त्याचप्रमाणे महाराष्ट्र प्लास्टीक आणि थर्माकोल उत्पादने (उत्पादन , वापर, विक्री , वाहतुक , हाताळणी आणि साठवण) अधिसुचना 2018 नुसार खालील अतिरिक्त सिंगल युज प्लास्टिक वस्तुंवर बंदी घालण्यात आली आहे.

1) सर्व प्रकारच्या कोणत्याही जाडीच्या प्लास्टिक पिशव्या (कॅरी बॅग) (हॅन्डलसह किंवा शिवाय) कम्पोस्टेबल प्लास्टिक (120 मायक्रॉनपुढील कचरा आणि नर्सरी पिशव्या वगळुन )
2) न विणलेल्या कॅरी बॅग पॉलिप्रॉपिलियन पासुन बनविलेल्या)
3) डिश, बाऊल , कन्टेनर (डब्बे) इ.

सदर नोटीसद्वारे सर्व उत्पादक , स्टॉकिस्ट, किरकोळ विक्रेते , दुकानदार , यांना कळविण्यात येत आहे की , ई- कॉमर्स कंपन्या , रस्त्यावरील विक्रेते, व्यावसायिक आस्थापने (मॉल्स , मार्केट प्लेस/ शॉपिंग सेंटर्स / सिनेमा घरे / पर्यटन ठिकाणे , शाळा, महाविद्यालये ,ऑफिस कॉम्प्लेक्स / रुग्णालये आणि इतर संस्था) आणि सामान्य नागरीक यांनी उत्पादन, साठवणुक ,वितरण ,विक्री आणि MOEF & CC अधिसुचनेमध्ये निर्दिष्ट केलेल्या वेळापत्रकानुसार सिंगल युज प्लास्टिक वस्तुंच्या वापराबाबत दि 30 जुन 2022 पर्यत ऊचित ती व्यवस्था करुन ठेवावी .

पर्यावरण संरक्षक कायदा 1986 अंतर्गत योग्य वाटल्यास वस्तु जप्त करणे पर्यावरणीय नूकसानभरपाई आकारणे , उद्योग व्यावसायिक आस्थापनांचे कामकाज बंद करणे या सुचनेचे उलंघन करणा-यांवर कारवाई केली जाऊ शकते.

वरील नियमानुसार सर्व किरकोळ विक्रेते , घाऊक विक्रेते , व्यापारी , विक्रेते , नागरिक , फेरीवाले जे नियमांचे उल्लंघन करतांना निदर्शनास आल्यास पहिल्या वेळी दंड रु. 5000/- दुस-या वेळी रु.10,000/- व तिस-या वेळी दंड रु. 25,000/- तसेच 3 महिने कारावासाच्या शिक्षेला पात्र असतील तरी सर्व नागरीक आस्थापना यांनी सदर आवाहनाची नोद घ्यावी.

(अजीज शेख )
प्रशासक तथा आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका